दैनिक
अदिती एक्सप्रेस

दि. १४ जानेवारी २०२६
बुधवार
वर्ष ४ थे
अंक ७७
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**

आजचे पंचाग
- दिनांक : १४ जानेवारी २०२६
- वार : बुधवार
- माह (अमावस्यांत) : पौष
- माह (पूर्णिमांत) : माघ
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : दशमी तिथी (दुपारी ०३:१७ पर्यंत) त्यानंतर एकादशी तिथी
- नक्षत्र : विशाखा नक्षत्र (१४ जानेवारी पहाटे १२:०६ पर्यंत) त्यानंतर अनुराधा नक्षत्र
- योग : शूल योग (रात्री ०७:०४ पर्यंत) त्यानंतर गण्ड योग
- करण : विस्ती भद्रा करण (दुपारी ०३:१७ पर्यंत) त्यानंतर भाव करण
- चंद्र राशी : तुळ राशी (सायंकाळी ०५:२० पर्यंत) त्यानंतर वृश्चिक राशी
- सूर्य राशी : धनु राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : दुपारी ०३:३३ ते सायंकाळी ०४:५६ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:२५ ते दुपारी ०१:०९
- सूर्योदय : सकाळी ०७:१६
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:१९
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांची घोषणा

५ फेब्रुवारीला मतदान ; ७ फेब्रुवारीला निकाल



मुंबई : राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत असलेल्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. या निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. या निवडणुकांमध्ये जिल्हा परिषदांच्या एकूण ७३१ जागा तर पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी मतदान होणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित सर्व जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रांत आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे.

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ते म्हणाले की, ही निवडणूक रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्ह्यांतील जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांसाठी होणार आहे.

निवडणुकीची अधिकृत सूचना १६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार असून ही प्रक्रिया संबंधित जिल्हाधिकारी आपापल्या स्तरावर पार पाडतील. **(पान २ वर)**

अनिल अंबानींना हायकोर्टाचा दिलासा सुरूच; बँकांच्या आरोपांवर प्रश्नचिन्ह



मुंबई : उद्योगपती अनिल अंबानी आणि रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडसंदर्भातील कर्ज फसवणूक प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला अंतरिम दिलासा सध्या तरी कायम ठेवण्यात आला आहे. कर्ज खाती 'फसवी' ठरवण्याच्या तीन राष्ट्रीयीकृत बँकांच्या कारवाईला दिलेली स्थगिती हटवावी, अशी मागणी करत बँकांनी दाखल केलेल्या आव्हानावर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सुनावणी घेतली. मात्र अंतिम निर्णय न देता न्यायालयाने प्रकरणाची पुढील सुनावणी १४ जानेवारीपर्यंत स्थगित केली आहे.

हायकोर्टाने नेमकं काय नमूद केलं?

अनिल अंबानी आणि रिलायन्स कम्युनिकेशन्सविरोधात इंडियन ओव्हरसीज बँक, आयडीबीआय बँक आणि बँक ऑफ बडोदा यांनी कर्ज खाती फसवी घोषित करण्याची प्रक्रिया सुरू केली होती.

मात्र, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या २०२४ च्या मास्टर परिपत्रकानुसार असा अहवाल पात्र सनदी लेखापालाच्या (उ) स्वाक्षरीशिवाय ग्राह्य धरता येत नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. संबंधित अहवालावर अधिकृत सीएची स्वाक्षरी नसल्याने त्यावर अवलंबून कारवाई करता येणार नाही, असे स्पष्ट करत २४ डिसेंबर रोजी न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या एकलपीठाने बँकांच्या कारवाईला स्थगिती दिली होती.

न्यायालयाने असेही स्पष्ट केले की, अशा प्रकारे कर्ज खाते फसवी घोषित केल्यास त्याचे परिणाम अत्यंत गंभीर असू शकतात. कंपनीला अनेक वर्षे कर्ज मिळू नये, कारवाईची शक्यता, रोजगारावर परिणाम आणि प्रतिष्ठेचे नुकसान यासारखे दूरगामी परिणाम होऊ शकतात.

वादाचा केंद्रबिंदू काय आहे?

अनिल अंबानी यांनी वैयक्तिकरित्या तसेच रिलायन्स कम्युनिकेशन्सच्या वतीने बँकांनी पाठवलेल्या कारणे दाखवा **(पान २ वर)**

आयाराम-गयाराम प्रवृत्ती लोकशाहीसाठी घातक

नागपूर : - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिलेल्या खास मुलाखतीत सध्याच्या राजकीय प्रवाहांवर स्पष्ट आणि परखड भाष्य करत आयाराम-गयाराम संस्कृतीवर अचूक निशाणा साधला आहे. सध्या भाजपमध्ये सर्वाधिक पक्षप्रवेश होत असून, आयाराम-गयारामांची सत्ताधा-यांकडे झुकण्याची ही मानसिकता लोकशाहीसाठी घातक असल्याची टीका गडकरी यांनी केली आहे.

गेल्या दोन वर्षांत इतर पक्षांच्या तुलनेत भाजपमध्ये सर्वाधिक प्रवेश झाले असल्याचे निरीक्षण गडकरींनी नोंदवले. राज्यागणिक प्रदेशाध्यक्षांमध्ये पक्षप्रवेशांची जणू स्पर्धाच लागल्याचे चित्र असल्याचेही त्यांनी सूचित केले. मात्र, या वाढत्या प्रवेशांमागील हेतू आणि निष्ठेचा प्रश्न उपस्थित करत त्यांनी आयाराम-गयाराम प्रवृत्तीवर थेट बोट ठेवले. सत्ताधा-यांकडे झुकण्याची ही मानसिकता लोकशाहीसाठी घातक असल्याचे सूचक विधान करत, त्यांनी या प्रवाहाकडे गंभीरपणे पाहण्याची गरज असल्याचे अप्रत्यक्षपणे सांगितले. गडकरींच्या या वक्तव्याने भाजपसह इतर पक्षांतीलही 'पक्षांतर' संस्कृतीवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

या मुलाखतीत गडकरींनी आपली वैयक्तिक बाजू आणि नागपूरशी असलेली भावनिक नाळही उलगडली. नागपूरची जनता हा माझा परिवार आहे, असे सांगत त्यांनी शहराबद्दलचा अभिमान व्यक्त केला. **(पान २ वर)**

रायसीना हिल्सजवळ पंतप्रधान मोदींचे नवे कार्यालय



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे रायसीना हिल्स परिसरातील नवे कार्यालय आता पूर्णपणे तयार झाले असून, या महिन्याच्या अखेरीस पंतप्रधान तेथे स्थलांतरित होण्याची शक्यता आहे. सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पाचा एक भाग असलेल्या या नव्या संकुलाला 'सेवा तीर्थ' असे नाव देण्यात आले आहे. 'सेवा तीर्थ' संकुलाची वैशिष्ट्ये अशी आहे की, या संकुलात एकूण तीन मुख्य इमारती आहेत.

सेवा तीर्थ येथे पंतप्रधानांचे मुख्य कार्यालय (PMO) असेल. दुसरे सेवा तीर्थ येथे कॅबिनेट सचिवालयाचे कामकाज चालेल. सेवा तीर्थ तीनमध्ये राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांचे कार्यालय असेल. नव्या पीएमओमध्ये 'ओपन फ्लोअर मॉडेल'चा वापर करण्यात आला आहे. अधिकाऱ्यांच्या मते, यामुळे कामकाजाच्या संस्कृतीत सकारात्मक बदल घडून येईल.

याशिवाय, परदेशी पाहुण्यांच्या स्वागतासाठी आणि बैठकांसाठी हाय-टेक खोल्या तयार करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानासोबतच हिंदुस्थानी **(पान २ वर)**

लाडक्या बहिणींची संक्रांत गोड; खात्यात पैसे जमा होण्यास सुरू

मुंबई : प्रतिनिधी- महाराष्ट्रातील लाडक्या बहिऐणींची संक्रांत गोड झाली आहे. नुकतीच पात्र महिलांच्या खात्यात डिसेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

दरम्यान, राज्यातील महापालिका निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील लाडक्या बहिऐणींना डिसेंबर आणि जानेवारीचा हप्ता एकत्र देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. परंतु त्यावर काँग्रेसने आयोगात धाव घेतली होती. त्यानंतर आयोगाकडून स्पष्ट भूमिका घेण्यात आली.

आयोगाने सरकारला महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असताना लाडकी बहीण योजनेचा नियमित किंवा प्रलंबित लाभ देता येईल, परंतु जानेवारी महिन्याचा लाभ आगाऊ स्वरूपात देण्यास मज्जाव केला आहे. त्यामुळे राज्यातील लाडक्या बहिऐणींच्या खात्यावर डिसेंबर महिन्याचे १५०० रुपयेच जमा होत आहेत.

आगाऊ रक्कम देण्यास आयोगाची मनाई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'लाडकी बहीण' योजनेंतर्गत जानेवारीचा १,५०० रुपयांचा आगाऊ हप्ता लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्यास राज्य निवडणूक आयोगाने राज्य सरकारला मनाई केली. तसेच नवीन लाभार्थी निवडण्यासही मनाई केली आहे. योजना असल्याने डिसेंबर २०२५ या महिन्याची १,५०० रुपयांची रक्कम देण्यास आयोगाने परवानगी दिली. १५ जानेवारीच्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर आयोगाने तसे निर्देश राज्य सरकारला दिले आहेत.

मकर संक्रातीच्या मुहूर्तावर काँग्रेसची पोकळ आश्वासने : आ. संभाजी पाटील निलंगेकर



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर/प्रतिनिधी : वर्षानुवर्षे लातूरची सर्व सत्तास्थाने काँग्रेसच्या लोकप्रतिनिधींच्या ताब्यात होती. एकहाती सत्ता जनतेने त्यांना दिलेली होती. पण या सत्तेचा वापर त्यांनी जनहितासाठी केला नाही. नेते मोठे झाले पण जनता आहे तेथेच राहिली. एकही विकास काम हे प्रतिनिधी करू शकले नाहीत. लातूरातील काँग्रेसचे लोकप्रतिनिधी हे निष्क्रियतेचा कळस गाठला आहे. आताही मकर संक्रातीच्या मुहूर्तावर पोकळ आश्वासने देवून नागरिकांचे तोंड कडू करण्याचे काम काँग्रेसकडून होताना दिसून येत आहे. असे आवाहन आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी काँग्रेसवर तोफ डागली.

लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ९ चे उमेदवार अमजदखाँ राजाखाँ पठाण, भाग्यश्री शहरकर, नजमा परवीन सलीम शेख, शाम जाधव तसेच प्रभाग क्रमांक १५ मधील उमेदवार दिपक मठपती, शिला पाटील, प्रेरणा होनराव व प्रविण कस्तुरे यांच्या प्रचारार्थ टिळकनगर, पोस्ट कार्यालयासमोर आयोजित सभेत आ. निलंगेकर बोलत होते. या सभेस शिवानंद हैबतपुरे, अविनाश कोळी, गुरुनाथ मगे, डॉ. नागोराव बोरगावकर, अहमद पठाण, शादाब शेख, अभिनंदन शहरकर, सचिन अलगुडे, संजय गवळी, विवेकानंद स्वामी, चंद्रकांत **(पान २ वर)**

मतदानाआधी राज्यातील राजकीय वातावरण तापले

मुंबई : प्रतिनिधी- राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकीची धामधूम सुरू आहे. महापालिका निवडणुकीच्या मतदानापूर्वी राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. महापालिका निवडणुकीपूर्वी ठिकठिकाणी राडे आणि पैशांच्या वाटपाचे आरोप होत आहेत. त्यातच डोंबिवली पूर्वे कडील तुकारामनगर परिसरात भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये तुंबळ हाणामारी झाली आहे. तर दुसरीकडे जळगावात पैसे वाटप करतानाचा व्हीडीओ व्हायरल झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. याबाबत प्रशासनाकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

डोंबिवलीच्या तुकारामनगर भागात पैसे वाटपाच्या संशयावरून भाजप आणि शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते आपापसात भिडले. भाजपचे जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी असा आरोप केला आहे की, आम्ही गणपती दर्शनासाठी गेलो असताना शिवसेना



उमेदवार रवी पाटील आणि नितीन पाटील यांनी कोयत्याने हल्ला केला. या हल्ल्यात उमेदवारांसह दोन्ही गटांचे चार जण जखमी झाले आहेत.

शिवसेना उमेदवार नितीन पाटील यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आम्ही कोणालाही मारले नाही. उलट भाजपचे लोक पैसे वाटताना पकडले गेले. पोलिसांना पहिला फोन आम्हीच केला. भाजपमध्ये प्रवेश केला नाही म्हणून आमदार रवींद्र चव्हाण हा राग काढत आहेत, असा दावा त्यांनी केला आहे. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण आहे. या दोन्ही बाजूंनी पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी घटनास्थळी धाव घेत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. एसीपी हेमंत हेमाडे यांनी प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे सांगितले आहे.

वरळीत पैसे वाटपाचे गंभीर आरोप

तसेच मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत वरळी विधानसभा मतदारसंघातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्या या बालेकिल्ल्यात आता पैसे वाटपाचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. वरळीतील प्रभाग क्रमांक १९३ च्या उमेदवार हेमांगी वरळीकर यांचे पती हरिश वरळीकर यांनी बैठकीच्या नावाखाली महिलांना बोलावून पैसे वाटल्याचा दावा शिंदे गट आणि **(पान २ वर)**

मोदी सरकारच्या धोरणाचा फायदा अंबानीला भुर्दड सामान्य जनतेला :प्रकाश आंबेडकर



दै. अदिती एक्सप्रेस

लातुर प्रतिनिधी: - राज्य आणि केंद्र शासनाच्या उदयोगपतीधर्जीन्या धोरणामुळे देशात महागाई आणि बेरोजगारीची समस्या निर्माण झाली आहे. ही समस्या आणखी वाढत राहीली तर भुकमरीचीही वेळ येऊ शकते. हे सर्व घडू दयायचे नसेल तर आता भाजपचे कंबरडे मोडणे आवश्यक बनले आहे. त्याची सुरूवात आपण लातूरपासून करावी, असे आवाहन करुन लातुर शहर महानगरपालिकेत काँग्रेस व वंचित आघाडीची सत्ता स्थापन झाल्यास भृष्टाचारमुक्त, पारदर्शक कारभार करुन येथील नागरिकांच्या समस्या सोडवल्या जातील अशी ग्वाही वंचित बहूजन आघाडीचे प्रकाश ऊर्फ बाळासाहेब आंबेडकर यानी केले आहे.

लातुर महानगरपालिका निवडणूकीतील काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ येथील छत्रपती राजर्षी शाहू महाराज चौक या परिसरात आयोजित प्रचार सभेत वंचित बहूजन आघाडीचे प्रकाश ऊर्फ बाळासाहेब आंबेडकर बोलत होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख होते.

आमदार अमित विलासराव देशमुख, महाराष्ट्र विधानसभा, माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद यांच्यासह लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार, चेअरमन धिरज विलासराव देशमुख, वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश सचिव मुफती वसीम सय्यद, काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस जितेद्र देहाडे, सरचिटणीस भाऊसाहेब आजबे, जिल्हाध्यक्ष किरण जाधव, जिल्हाध्यक्ष अभय सांळुके, बहुजन वंचितचे जिल्हाध्यक्ष मजुषा निबाळकर, संतोष सुर्यवंशी यांच्यासह अनेक **(पान २ वर)**

लातूरच्या प्रश्नांची मुख्यमंत्री करणार सोडवणूक

प्रभाग १७ मध्ये जाहीर सभेत आ. अभिमन्यू पवार यांचे प्रतिपादन

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर/प्रतिनिधी : लातूरच्या प्रश्नांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभ्यास केला आहे. तेच हे सर्व प्रश्न सोडविण्यास सक्षम आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे हात बळकट करण्यासाठी लातूरची महानगरपालिका भाजपाच्या ताब्यात द्या, असे आवाहन औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.

प्रभाग क्रमांक १७ मधील भाजपाचे उमेदवार अनंत गायकवाड, संगीता मिरचे व शोभा पाटील यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत आ. पवार बोलत होते. या सभेस ग्रामीण जिल्हाध्यक्ष माजी मंत्री बस्वराज पाटील मुरुमकर, अरविंद पाटील



निलंगेकर, गिरीष पाटील, श्रीमती अपर्णा कोरे, स्वाती जाधव, संतोष बेंबडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. पवार म्हणाले की, पिण्याचे पाणी, वाहतूक कोंडी, स्वच्छता, ड्रेनेज या लातूरकरांच्या मुख्य समस्या आहेत. त्या दूर करण्यासाठी आराखडा तयार केलेला आहे. लातूरची सत्ता आपण दिलीत तर लगेचच विविध योजनांची कामे सुरु होणार आहेत. आम्ही सेवा करणारे उमेदवार आपल्यासमोर दिले आहेत. त्यांना विजयी करा, असे आवाहनही आ. अभिमन्यू पवार यांनी केले. आ. पवार यांनी सांगितले की, लातूरकरांसाठी पाणी योजना मुख्यमंत्र्यांनी सुरु केली आहे. त्याचे २५ टक्के काम पूर्ण झाले आहे. **(पान २ वर)**

कभी हां, कभी ना...

ट्रम्प स्वतःला जगाचे शासक समजू लागलेत. त्यामुळे गोर यांचा भारत दौरा असो की आंतरराष्ट्रीय व्यासपीठ असो, भारताला धडा शिकवण्याचा ट्रम्प यांचा निर्धार आहे. पण, ट्रम्प असो वा कुणीही असो भारत कुणासमोरही झुकणार नाही.

ट्रम्प यांनी भारतासह काही देशांवर ५०० टक्के टॅरिफ लावण्याची धमकी दिली. याचे कारण भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे. याचा राग ट्रम्प यांनी भारतावर आणि ब्राझीलसारख्या काही देशांवर काढला. ट्रम्प यांच्या या संतापाचा सर्वात गंभीर परिणाम भारत, चीन आणि ब्राझील या देशांना बसणार. त्यासाठी गोर जेव्हा भारत दौऱ्यावर आले तेव्हा त्यांनी भारतावर 'सँक्शनिंग ऑफ रशिया' कायद्याला पाठिंबा देण्यासाठी भारतावर दबाव आणला नाही, पण त्यांचा हेतू आणि बोलण्याचा मथितार्थ तोच होता. ट्रम्प यांचा भारतावर ५०० टक्के टॅरिफ लावण्याचा कट असंयुक्तिक तर आहेच, पण लहरीपणाचे द्योतक आहे. ट्रम्प स्वतःला जगाचे शासक समजू लागलेत. त्यामुळे गोर यांचा भारत दौरा असो की आंतरराष्ट्रीय व्यासपीठ असो. भारताला धडा शिकवण्याचा ट्रम्प यांचा निर्धार आहे. पण, ट्रम्प असो वा कुणीही असो भारत कुणासमोरही झुकला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखा तगड्या नेत्याच्या हातात भारताची सूत्रे आहेत. त्यामुळे मोदी यांचा भारत-अमेरिकेच्या या दंडेलशाहीपुढे झुकणार नाही हे स्पष्ट आहे. हेच गोर यांच्या दौऱ्यानंतरही भारताने दाखवून दिले. ट्रम्प यांच्या या दंडेलशाहीचे कारण स्पष्ट आहे.

ट्रम्प यांना रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध थांबवण्याचे श्रेय हवे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातीलही युद्ध संपवण्याचे श्रेय घेण्याचा त्यांनी अनेकदा प्रयत्न केला, पण भारताने त्यांच्या या बनवेगिरीला भीक घातली नाही. आता गोर यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने भारतावर आणखी एक दबाव आणण्याचा प्रयत्न ट्रम्प यांनी केला. पण गोर यांचा हा प्रयत्न भारताच्या ठाम नकारामुळे हाणून पाडला. जगभरातील युद्धे रोखून शांतता पुरस्कार मिळवण्याची ट्रम्प यांची धडपड अव्याहत सुरू आहे, पण तिला यश येत नाही. म्हणून ट्रम्प या पद्धतीने उत्तर देण्याचा प्रयत्न करत आहे. गोर यांचा दौरा कितपत यशस्वी झाला, ही बाब अलाहिदा. पण ट्रम्प यांनी असा विचार केला पाहिजे, की ५०० टक्के टॅरिफ लावला तर भारत आणि चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तू अमेरिकेत प्रचंड महाग होतील. अमेरिकेत यादवी युद्ध होईल आणि अमेरिकन नागरिक ट्रम्प प्रशासनाविरुद्ध युद्ध सुरू करतील. तसेही अमेरिकेत कामगारांचे वेतन महाग असल्याने तेथे उत्पादन खूप महाग पडते. या प्रकारे टॅरिफ वाढवल्याने अमेरिकन नागरिकांचा राग आपल्याच म्हणजे ट्रम्प यांच्याविरोधात उसळेल. तसेही ट्रम्प यांच्या मनमानी पद्धतीने टॅरिफ लावण्याच्या या प्रकाराला अमेरिकन कनिष्ठ न्यायालयाने आधीच ठोकरून लावले. भारत-अमेरिका व्यापारविषयक बोलणी अद्याप पूर्ण झालेली नाहीत. मोदी यांना अत्यंत विचाराने आणि आर्थिक आणि राजनैतिक पैलूंचा सर्व प्रकारे विचार करून निर्णय घेतला पाहिजे. मोदी सरकारने सध्या आर्थिक स्थैर्य यांचा विचार करून निर्णय घ्यायला हवा. ट्रम्प यांच्या धमकीपुढे घाबरून जाऊ नये. ट्रम्प यांच्या टॅरिफच्या तोडीसतोड म्हणून भारताने ब्रिक्स आणि ट्रम्प यांच्या टॅरिफने असेच जे पोळलेले देश आहेत त्यांच्याबरोबर येऊन काम केले. ट्रम्प जेव्हा म्हणतात, की सत्तेमुळे माझ्या नैतिकतेला चाप लावला आहे, तेव्हा समजून जा; की ट्रम्प यांचे हे विधान म्हणजे ढोंगीपणाचे द्योतक आहे. पण त्याविरोधात कारवाई करताना ट्रम्प यांच्या आततायी विधानांकडे लक्ष न देता भारताने आपले वास्तव पाहिले पाहिजे. दोन्ही सेन्सेक्स आणि निफ्टी याच आठवड्यात २.५ टक्क्यांनी कोसळले. परदेशी गुंतवणूकदारांनी १.३ अब्ज डॉलरची गुंतवणूक देशातून बाहेर काढून नेली. रुपया कोसळून ९०.१६च्या वर उतरला आणि यात जागतिक अनिश्चित वातावरण भर टाकत आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध संपुष्टात येण्याची चिन्हे नाहीत आणि इराण आणि व्हेनेझुएलाने आंतरराष्ट्रीय अस्थिर परिस्थितीत आपल्या परीने भर टाकली. पण ट्रम्प यांनी धमकी दिली असली तरी भारतासमोर काही पर्याय आहेत. त्यापैकी एक आहे तो म्हणजे निर्यात बाजारपेठेत विविधता आणणे. त्यासोबत मेक्सिको, चीन आणि ब्रिक्स देशांबरोबर भारताने व्यापार वाढवण्याची तयारी सुरू केली पाहिजे. त्याद्वारेच भारत ट्रम्प यांच्या दादागिरीला उत्तर देऊ शकतो. भारताचा ब्रिटनबरोबर मुक्त व्यापार करार झाला. तेव्हापासूनच ट्रम्प यांचा पारा चढला आणि भारताला कसा धडा शिकवू असे त्यांना झाले. ट्रम्प यांनी टॅरिफ भरमसाट प्रमाणात लावण्यासाठी जी धमकी दिली, त्यात आणखी एक आव्हान आहे. ते म्हणजे नवीन बाजारपेठा मिळवण्याचा खर्च.

पण तातडीचा उपाय हाच आहे, की ट्रम्प यांच्या दादागिरीला भारताने जशास तसे उत्तर दिले पाहिजे. त्यासाठी भारताने ब्रिक्स देशांशी व्यापक समझोते केले पाहिजेत आणि भारत आणि इंग्लंडच्या धर्तीवर ब्रिक्स देशांशीही तशाच पद्धतीने करार केल्यास ट्रम्प यांचे नाक आपोआप दाबले जाईल. भारताने नुकतीच अमेरिकन ट्रेझरी बाँडमधील आपली गुंतवणूक झपाट्याने कमी केली. यामुळे ट्रम्प यांच्या नाकातोंडात पाणी गेले. हा धक्का ट्रम्प आणि डॉलरसाठी प्रचंड मानला जातो. भारताने गुंतवणुकीचे अन्य पर्याय शोधलेत. एका आकडेवारीनुसार भारताने ३१ ऑक्टोबर २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान अमेरिकन गुंतवणूक तब्बल २१ टक्क्यांनी कमी केली. आता टॅरिफनंतर ही गुंतवणूक झपाट्याने कमी होत आहे. गोर यांच्या दौऱ्याचा काही उपयोग झाला नाही. उलट भारताचा ट्रम्प यांच्या दादागिरीपुढे न झुकण्याचा निर्धार वाढला. दुसरा धक्का भारताने काही देशासोबत रुपयांमध्ये व्यवहार सुरू केले आणि हाही ट्रम्प यांना धक्का मानला जातो. सिल्व्हर लायनिंग अशी, की भारताची अर्थव्यवस्था आणखी मजबूत आहे. हे मत भारतीयाचे नाही; न्यूयॉर्क टाइम्सने हे वृत्त प्रसिद्ध केले. अमेरिकेतच ट्रम्प यांच्या टॅरिफच्या निर्णयाला कसा विरोध होत आहे हे समजून येते. गोर यांच्या दौऱ्याचा उपयोग भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार युद्ध कमी करण्याच्या दृष्टीने तर झाला नाही. पण अमेरिका हे समजून जाईल, की भारताला आता दादागिरीने नमवणे शक्य नाही. येथे नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे हे त्यानी लक्षात घेतले तरी पुरे.



जनगणनेची कार्यवाही अचूक होण्यासाठी गांभीर्याने काम करा :जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

घर यादी, गटांची रचनाबाबत अधिकाऱ्यांना प्रशिक्षण

लातूर, / प्रतिनिधी- केंद्र शासनाने २०२७ मध्ये जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने जनगणना संचालनालयामार्फत प्रशिक्षण व पूर्वतयारी सुरु करण्यात आली आहे. या प्रशिक्षणामध्ये देण्यात येणाऱ्या माहितीनुसार सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यवाही करावी. जनगणनेची कार्यवाही अचूक होण्यासाठी सर्वांनी गांभीर्याने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित भारतीय जनगणना २०२७ विषयक प्रशिक्षण सत्राच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी बोलत होत्या. मुंबई येथील जनगणना संचालनालायचे सहाय्यक संचालक प्रवीण भगत, जनगणना संचालनालायचे अरुण साळगावकर, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सायली ठाकूर, तहसीलदार वर्षा मनाळे यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

समाजातील घटकांच्या सर्वांगीण विकासाचे नियोजन करताना जनगणनेचा अहवाल उपयुक्त ठरतो. या माहितीच्या आधारे विविध योजना, विकासाची दिशा निश्चित केली जाते. त्यामुळे आगामी जनगणना अचूक होण्यासाठी सर्वांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी. प्रथमच जनगणना डिजिटल स्वरुपात होत असून त्यादृष्टीने देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाला सर्वांची उपस्थिती बंधनकारक असून या प्रशिक्षणात देण्यात येणाऱ्या सूचनांची अंमलबजावणी करावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. जनगणनेतून एकही घर सुटणार नाही, याची काळजी घ्यावी, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी सर्व तहसीलदार, सर्व नगरपरिषद व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी यांच्यासह जनगणनेसाठी नियुक्त क्षेत्रीय अधिकारी यांची उपस्थिती होती. घर यादी, गटांची रचना याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

पान १ वरून

जिल्हा परिषद...

त्याच दिवसापासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होईल. इच्छुक उमेदवारांना २१ जानेवारी २०२६ पर्यंत आपले उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत.

वाघमारे यांनी सांगितले की, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. आचारसंहितेचे काटेकोर पालन केले जाईल. कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार, प्रलोभने किंवा नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

निवडणूक कार्यक्रम - एक नजर जिल्हाधिकाऱ्यांकडून निवडणूक कार्यक्रमाची प्रसिद्धी : १६ जानेवारी २०२६ उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत : १६ ते २१ जानेवारी २०२६ उमेदवारी अर्जांची छाननी : २२ जानेवारी २०२६ अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत : २७ जानेवारी २०२६ (दुपारी ३ वाजेपर्यंत) अंतिम उमेदवार यादी व निवडणूक चिन्ह वाटप : २७ जानेवारी २०२६ (दुपारी ३.३० नंतर) मतदानाचा दिवस : ५ फेब्रुवारी २०२६ (सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३०)

रायसीना...

संस्कृती आणि परंपरेची झलक पाहायला मिळेल. स्वातंत्र्यापासून पंतप्रधानांचे कार्यालय 'साउथ ब्लॉक'मध्ये होते. आता हे कार्यालय 'सेवा तीर्थ'मध्ये हलवण्यात येत आहे. जुन्या नॉर्थ आणि साउथ ब्लॉकच्या इमारतींमध्ये आता ५००० वर्षांचा हिंदुस्थानचा इतिहास सांगणारे एक भव्य संग्रहालय उभारले जाणार आहे. या संग्रहालयाचा पहिला टप्पा पुढील वर्षाच्या सुरुवातीला खुला होण्याची शक्यता आहे. निवासस्थानही बदलणार पंतप्रधानांचे नवे निवासस्थानही या कार्यालयाजवळच बांधले जात आहे. त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पंतप्रधान ७, लोककल्याण मार्ग हे आपले सध्याचे निवासस्थान सोडून नव्या घरात वास्तव्यास येतील. सूत्रांनी सांगितले की, पंतप्रधान कार्यालयात स्थलांतर करण्यासाठी या महिन्यात दोन मुहूर्त काढण्यात आले आहेत. पहिला १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांतीच्या दिवशी आणि दुसरा १९ जानेवारी ते २७ जानेवारीदरम्यान, गुप्त नवरात्रीपर्यंत आहे. तथापि, तोपर्यंत जर फिनिशिंगचे काम पूर्ण झाले नाही, तर फेब्रुवारीमध्येही कोणतीही तारीख निश्चित केली जाऊ शकते. सेंट्रल विस्टा प्रकल्प काय आहे? सेंट्रल विस्टा प्रकल्पांतर्गत राष्ट्रपती भवन ते इंडिया गेटपर्यंत अनेक इमारतींचा पुनर्विकास आणि बांधकाम समाविष्ट आहे. यात नवीन संसद भवन, मंत्रालयाच्या कार्यालयांसाठी केंद्रीय सचिवालय, पंतप्रधान निवासस्थान, उपराष्ट्रपती निवासस्थान यांचे बांधकाम केले जाणार आहे. सेंट्रल विस्टा प्रकल्पाची घोषणा सप्टेंबर, २०१९ मध्ये झाली होती. १० डिसेंबर, २०२० रोजी पंतप्रधान मोदींनी प्रकल्पाची पायाभरणी केली होती. सरकारने संपूर्ण प्रकल्पासाठी २० हजार कोटी रुपयांचे बजेट ठेवले आहे. कर्तव्य पथाच्या दोन्ही बाजूंच्या परिसराला सेंट्रल विस्टा म्हणतात.

अनिल अंबानींना...

नोटिसांना आव्हान देत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. बँकांनी नियुक्त केलेली बीडीओ एलएलपी ही संस्था लेखापरीक्षक नसून सल्लागार स्वरूपाची आहे, त्यामुळे तिचा अहवाल कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य धरता येत नाही, असा दावा अंबानी यांच्या याचिकेत करण्यात आला आहे.

याउलट, बँकांनी असा युक्तिवाद केला की, संबंधित लेखापरीक्षण २०१६ मधील आरबीआय परिपत्रकानुसार करण्यात आले असून बाह्य लेखापरीक्षकाची गरज नाही. मात्र हा युक्तिवाद न्यायालयाने प्राथमिक टप्प्यावर स्वीकारलेला नाही.

बँकांवर न्यायालयाची कठोर टिप्पणी

सुनावणीदरम्यान न्यायालयाने बँकांच्या विलंबावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. २०१३ ते २०१७ या कालावधीतील व्यवहारांचे लेखापरीक्षण २०१९ मध्ये करण्याचा निर्णय घेतला, तोपर्यंत बँका काय करत होत्या? असा थेट सवाल खंडपीठाने उपस्थित केला.

तसेच, आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केवळ पात्र सनदी लेखापालालाच अशा प्रकारच्या लेखापरीक्षणासाठी नेमण्याचा अधिकार असताना तो नियम कसा डावलला गेला, यावरही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. बीडीओ एलएलपीने यापूर्वीही कर्ज देणाऱ्या बँकांसाठी सल्लागार म्हणून काम केले असल्याने त्यांची स्वतंत्रता संशयाच्या भोवऱ्यात येते, असे निरीक्षणही नोंदवण्यात आले.

पुढे काय?

१४ जानेवारीला होणाऱ्या पुढील सुनावणीत बँकांच्या आव्हानावर सविस्तर युक्तिवाद होणार असून, तोपर्यंत अनिल अंबानी आणि रिलायन्स कम्युनिकेशन्सविरोधातील कडक कारवाईला न्यायालयीन संरक्षण मिळणार आहे.

आयाराम-गयाराम...

नागपूरच्या विकासाचे मोठे व्हिजन

गडचिरोलीसारखा आर्थिकदृष्ट्या मागास जिल्हा आणि आदिवासीबहुल भागात उद्योग सुरू होत असल्याचे सांगत गडकरींनी विदर्भाच्या विकासाचा व्यापक दृष्टिकोन मांडला. नागपूरला आंतरराष्ट्रीय विमानतळ मिळावे यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट करत त्यांनी शहराला जागतिक नकाशावर आणण्याचा निर्धार व्यक्त केला.

मकर संक्रातीच्या...

कुलकर्णी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

आ. निलंगेकर यांनी सांगितले की, जनतेच्या सेवेसाठी लोकप्रतिनिधी सभागृहात जात असतात. जनतेनेच त्यांना निवडून दिलेले असते. पण निवडून आल्यानंतर काँग्रेसचे लोकप्रतिनिधी जनतेला विसरून जातात. आपण ज्या जनतेच्या मतावर निवडून आलो त्यांचे काही देणे घेणेलागतो ते त्यांच्या लक्षातही राहत नाही. यामुळे विकास कामे होत नाहीत. जनतेच्या मुलभूत गरजा सोडविण्याची कामे सुध्दा लातूरमधील लोकप्रतिनिधींनी आजपर्यंत केली नाहीत.

अनेक वर्षे लातूरचे खासदार, आमदार, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अध्यक्ष आणि सदस्य, महापौर व नगरसेवक पदे काँग्रेसच्या प्रतिनिधींना मिळाली पण त्यांना विकास काय असतो हे कळले नाही. विकासाची दृष्टी नसल्यामुळे सरकारकडून योजना मंजूर करून घेण्यात ते कमी पडले. परिणामी जनतेचे नुकसान झाले.लातूर शहरातील पाण्याचा प्रश्न सुटला नाही. कचरा व्यवस्थापनाबाबत त्यांनी कधी विचारही केला नाही. तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी मोठे उद्योग उभे केले नाहीत. स्वत:ची कारखानदारी मात्र त्यांनी चांगल्या पध्दतीने जोपासल्याचेही आ. निलंगेकर यांनी म्हटले.

यावेळी प्रभाग ९ व १५ मधील मतदार आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

मतदानाआधी...

अपक्ष उमेदवारांनी केला आहे. विशेष म्हणजे, ठाकरेंच्या शिवसेनेचे माजी शाखाप्रमुख सूर्यकांत कोळी, ज्यांनी उमेदवारी न मिळाल्याने बंडखोरी करत अपक्ष म्हणून शड्डू ठोकला आहे. त्यांनीच या कथित पैसे वाटपाचे व्हीडीओ समोर आणले आहेत.

जळगावात पैसे वाटपाचा व्हीडीओ व्हायरल

जळगावच्या प्रभाग ११ मध्ये शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांकडून पैसे वाटप होत असल्याचा व्हीडीओ व्हायरल झाला आहे. अपक्ष उमेदवारांनी याप्रकरणी जिल्हाधिका-यांकडे लेखी तक्रार केली आहे. याबद्दल कारवाईची मागणी केली आहे.

या प्रकरणावर शिवसेनेच्या महिला आघाडी जिल्हाप्रमुख सरिता माळी यांनी स्पष्टीकरण दिले आहे. प्रचार रॅलीमध्ये काम करणा-या बचत गटाच्या महिलांना त्यांच्या कामाचे (रोजंदारीचे) पैसे दिले जात होते. त्याचा कोणीतरी चुकीच्या पद्धतीने व्हीडीओ बनवला आहे. मतदारांना पैसे वाटण्याचा कोणताही प्रकार घडलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

मोदी सरकारच्या...

मान्यवर उपस्थित होते.

मोदी सरकारच्या धोरणाचा फायदा अंबानीला भुर्दड सामान्य जनतेला - प्रकाश ऊर्फ बाळासाहेब आंबेडकर

सत्ताधारी या प्रसंगी बोलतांना प्रकाश ऊर्फ बाळासाहेब आंबेडकर म्हणाले की, केंद्र आणि राज्यातील सरकार हे साामान्य माणसांचा विचार करणारे सरकार नाही. हे उदयोगपतीधार्जीणे सरकार आहे. मोदी सरकारचे लाडक्या अंबानी यांची रिलाएन्य कंपनी रशीयाकडून तेल आयात करुन इतर देशाना निर्यात करते यातून या कंपनीला दरवर्षी ४० हजार कोटी रुपयाचा नफा होतो आहे. रशियाकडून भारत तेल आयात करतो त्यामुळे अमेरिका भारतावर अनेक प्रकारचे टॅक्स लावत आहे. त्या टॅक्समुळे भारतातील महागाई गगनाला भिडली आहे. येत्या काही दिवसात भरतीय रुपयाचे अवमुल्यन होवून अमेरिकन डॉलरची किंमत १३० रुपया पर्यंत जाणार आहे. परिणामी आणखीन महागाई भडकणार आहे. मोदी सरकारच्या धोरणाचा फायदा अंबानीला आणि भुर्दड सामान्या जनतेला अशी सदयाची अवस्था बनली आहे.

शासनाच्या उदयोगपतीधार्जीण्या धोरणामुळे बेकारीची समस्या वाढली आहे. वाढती बेरोजगारी आणि महागाई यातून भुकमरीसारखी देशात वेळ येऊ दयायची नसेल तर तर समविचारी पक्षांनी एकत्र येवून केंद्र आणि राज्यात सत्ता बदल घडवणे आवश्यक आहे. त्याची सुरूवात आपणाला लातूर महानगरपालीका पासून करायची आहे. या महानगरपालीका निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहूजन आघाडीच्या सर्व उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चवहाण यांचे आठवणी पुसण्या संदर्भातील हे वक्तव्य लातूरकरांच्या स्वाभीमानाला अस्मितेला धक्का देणारे ठरले आहे, यातून लातूरकरांच्या मनात प्रचंड प्रक्षोभ निर्माण झाला आहे. येत्या १५ तारखेला लातूरकरांनी काँग्रेस वचित बहूजन आघाडीच्या उमेदवारांना मतदान करुन हा प्रक्षोभ शांत करावा आणि भाजप नेत्यांना धडा शिकवावा असे आवाहन त्यांनी केले. भृष्टाचार आणि अन्याय करणाऱ्यांना संरक्षण देण्याचे काम भाजपचे सत्ताधारी नेते करीत आहेत. हे आपण लातूरमध्ये पाहीले आहे आणि राज्यातही पाहीले आणि देशातही तेच घडते आहे या बददल ही जनतेच्या मनात आता सत्ताधाऱ्या बददल रोष निर्माण झाला आहे. या भृष्टाचारी लोकांना सरंक्षण देणाऱ्या सत्ताधारी मंडळींना धडा शिकवण्याचे काम या निवडणुकीतून होइल असा विश्वास माजी मत्री दिलीपराव देशमुख यांनी वयक्त केला.

या महानगरपालीका निवडणुकीच्या निमीत्ताने काँग्रेस वंचित बहूजन आघाडीच्या विरोधात प्रचार करण्यासाठी सत्ताधारी पक्षाचे डझनभर मंत्री आणि आमदार निवडणुक रिगणात उतरले आहेत. आपले एकटे अमितभैय्या त्यांना भिडले आहेत. लातूरकरांनी या लढाइत अमित भैय्याना साथ देवून काँग्रेस व वंचित बहूजन आघाडीचे सर्व उमेदवार विजयी करावे असे आवाहन केले.

जातीधर्मात व्देष निर्माण करुन सत्तेवर आलेल्या महायुतीतील नेते मंडळींना सत्तेचा उन्माद आला आहे. ते आता विरोधी विचारांचा पराभव करण्याचे बोलत नाहीत तर या विचारांचा खुन करण्याची मनोवृत्ती त्यांची बनली आहे. कुठलाही विचार कधी संपत नसतो हे दाखवून देण्यासाठी लातूरमध्ये काँग्रेस आणि वंचित बहूजन आघाडी एकत्र येवून लातूर महानगरपालीका निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. ही आघाडी म्हणजे लातूरचा आत्मा असून या आघाडीच्या उमेदवारांना जनतेनी भरभरून आशीर्वाद दयावेत असे आवाहन माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी केले.

'है किसकी मजाल कि हमें बेघर कर सके काँग्रेस पक्ष आणि या पक्षाचे नेते आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर, आदरणीय शिवाजीराव पाटीलील निलंगेकर, आदरणीय विलासराव देशमुख या नेत्यांनी लातूर शहर आणि जिल्हयात सामाजिक एकोपा जोपासत विकास प्रक्रीयेला गती दिली. आदरणीय दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सवर्जण मंडळी मिळून ही विकास प्रक्रीया पूढे नेत आहोत. त्यामुळे लातूरच्या विकासाचा रथ कोणीही रोखू शकत नाही अशा आशयाचा 'है किसकी मजाल कि हमें बेघर कर सके,हम वहाँ के हैं जहाँ हवाएँ भी सलाम करती हैं शेर सादर केला त्यास जनतेतून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

लातूरच्या प्रश्नांची...

आता दुसजया टप्प्यातील योजनेसाठी २५९ कोटी रुपये मंजूर केले जाणार आहेत. शहरात पाण्याच्या ६ नव्या टाक्या बांधल्या जाणार आहेत. जिल्हा शासकीय रुग्णालयासाठी जमीन हस्तांतरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी लातूरसाठी नवा महामार्ग मंजूर केला आहे. यामुळे प्रत्येक मतदाराने किमान दहा इतर मतदारांना भाजपाला मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे, असे ते म्हणाले.

त्यांनी सांगितले की, काँग्रेसने लाडकी बहीण योजनेचे पैसे थांबवावेत म्हणून निवडणूक आयोगाला पत्र दिले आहे. पण यामुळे बहिणींचा तळतळाट काँग्रेसला लागणार आहे. लाडक्या बहिणी काँग्रेसला कधीही माफ करणार नाहीत. देवाभाऊ मुख्यमंत्री असेपर्यंत ही योजना चालूच राहणार आहे, असेही ते म्हणाले.

बस्वराज पाटील यांनी लातूरात स्मार्ट सिटी योजना राबविणार असल्याचे सांगितले. शैक्षणिक क्षेत्रात लातूरचा पॅटर्न आहे. या निवडणुकीच्या माध्यमातून लातूर पॅटर्नचे वैभव वाढविण्याची संधी आपणास प्राप्त झालीआहे. मतदारांनी भाजपाच्या पाठीशी राहून विकासाला संधी द्यावी, असेही ते म्हणाले.

या सभेस प्रभाग १७ मधील मतदार व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. गिरीष पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

राम मंदीर झाले पण रस्ता रखडलेलाच : निलंगेकर

यावेळी बोलताना अरविंद पाटील निलगेकर म्हणाले की, आयोध्येतील राम मंदीरासंदर्भात न्यायालयाने निर्णय दिला. त्यानंतर राममंदीराचे बांधकाम सुरु झाले. मंदीरात मुर्तीची स्थापना होवून त्याचा वर्धापन दिनही साजरा झाला. किचकट प्रक्रिया असतानाही ते काम पूर्ण झाले. पण एकहाती सत्ता असताना स्व. विलासराव देशमुख यांचे नाव असणाजया समांतर रस्त्याचे काम अद्यापही पूर्ण होवू शकलेले नाही. यावरूनच विरोधकांची काम करण्याची पध्दत दिसून येते. मुख्यमंत्र्यांनी लातूरच्या विकासाचे पालकत्व स्वीकारले आहे. आपण त्यांना अनुमोदन दिले पाहिजे, असेही ते म्हणाले.

'डिजिटल अरेस्ट'द्वारे निवृत्तास गंडा

७१ लाखांची फसवणूक, ४० लाख परत मिळविण्यात यश



तत्काळ तक्रार केल्याने दिलासा

फसवणुकीची तक्रार तत्काळ दाखल केल्यामुळे ७१ लाखांपैकी ४० लाख ६३ हजार ८७० रुपये बँकांमध्ये होल्डवर ठेवण्यात सायबर पोलिसांना यश मिळाले. ही रक्कम ५७ बँकांमध्ये चोरट्यांनी जमा करण्याचा प्रयत्न केला होता. अखेर न्यायालयाच्या आदेशानुसार ही रक्कम फिर्यादीस परत मिळण्यात यश आले. याबाबतचे कायदेशीर कामकाज ॲड. शेळ्ळाळे यांनी पाहिले.

लातूर, / प्रतिनिधी- शहरातील एका निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला 'डिजिटल अरेस्ट'चा बनाव रचून सायबर भामट्यांनी तब्बल ७१ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली. फसवणुकीतील ४० लाख ६३ हजार रुपयांची रक्कम सायबर पोलिस आणि न्यायालयाच्या मदतीने संबंधितास परत मिळाली, असे सायबर पोलिसांनी सोमवारी (ता. १२) सांगितले.

निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला आरोपींनी स्वतःला तपास यंत्रणांचे अधिकारी असल्याचे भासवून मानसिक दबाव टाकत विविध बँक खात्यांत रक्कम वर्ग करण्यास भाग पाडले. ही घटना गेल्या ऑगस्टमध्ये घडली असली तरी आता उजेडात आली आहे.

संबंधीत निवृत्त अधिकाऱ्याने सायबर पोलिस विभागाकडे तक्रार दाखल केली. तसेच, ॲड. राहुल शेळ्ळाळे यांनी पीडितास नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल, सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० वर त्वरित तक्रार दाखल करण्याचा सल्ला दिला. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून, निवृत्त अधिकाऱ्याची बाजू न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडली.

शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग १५ जानेवारी रोजी बंद राहणार

लातूर, : महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी बंद राहील. तसेच शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादक: गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारात स्वराज्य व राष्ट्र निर्मितीला प्राधान्य:प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी



देगलूर (प्रतिनिधी) : विविध शाह्यांच्या वर्चस्वाखाली दबलेल्या मराठी जनतेच्या हितासाठी स्वराज्य निर्मितीच्या वैचारिक संस्कारातून बाल शिवबाचे छत्रपती शिवाजी महाराज या जागतिक नेतृत्वात रूपांतर करणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ व प्रबळ राष्ट्र निर्मितीसाठी युवकांच्या सृजनशील आणि कार्यक्षमतेवर विश्वास असणारे स्वामी विवेकानंद या दोन्ही मान्यवरांच्या विचारात अनुक्रमे स्वराज्य व राष्ट्र निर्मितीला प्राधान्य होते असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात महिला समुपदेशन समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने १२ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमात प्रथम राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके, प्रमुख मार्गदर्शक डॉ. अनिल जाधव, महिला समुपदेशन समितीच्या डॉ. सौ. नेरकर संजीवनी, डॉ. सौ. गायकवाड पुष्पा, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. भास्कर कोशीडगेवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्य व विचाराला उजाळा देत प्रमुख मार्गदर्शक डॉ. अनिल जाधव यांनी, आज लोकशाहीच्या युगात विद्यार्थ्यांनी ज्ञानरूपी तलवार अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या यांचे विचार अंगीकारल्यास देश बलशाली होऊ शकेल असा विश्वास उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके यांनी व्यक्त केला. डॉ. सौ. नेरकर संजीवनी यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा प्रतिपादन केली. यावेळी कु. गायत्री पाटील, कु. नेहा नाईकवाडे, कु. वर्षा कंदुलवार, कु. अश्विनी गायकवाड, कु. ज्योती नूचुलवार इत्यादी विद्यार्थिनींनी राष्ट्रमाता जिजाऊचा पेहराव परिधान केलेला होता तसेच प्रतिभा अशोक घाटे या शालेय विद्यार्थिनीने राष्ट्रमाता जिजाऊंच्या स्वराज्य स्थापनेच्या इच्छाशक्तीचे विचार प्रतिपादन केले. हरीओम आलाकोंडे या विद्यार्थ्याने, माणसाने माणसाशी माणसासम वागणे हे गीत बासरी वादनातून सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. तेजस्विनी वरने या विद्यार्थिनींनी केले तर आभार डॉ. सौ. गायकवाड पुष्पा यांनी मानले.

देगलूर महाविद्यालयात जागतिक हिंदी दिन संपन्न



देगलूर(प्रतिनिधी): अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयात जागतिक हिंदी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी मुन्शी प्रेमचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. प्रास्ताविकातून हिंदी विभागप्रमुख डॉ. संतोष येरावार यांनी हिंदी भाषा आणि साहित्याचे महत्त्व अधोरेखित केले, जागतिक स्तरावरील हिंदी भाषेचे हे स्पष्ट केले आणि जागतिक स्थिती देखील मांडली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे आयक्यूएसी समन्वयक डॉ. विनय भोगले यांनी केले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की, हिंदी ही केवळ एक भाषा नाही, तर आपल्या सांस्कृतिक ओळखीचे आणि राष्ट्रीय एकतेचे शक्तिशाली माध्यम आहे. आज जागतिकीकरणाच्या युगात हिंदीचे महत्त्व सतत वाढत आहे आणि ती रोजगाराच्या नवीन संधी देखील प्रदान करत आहे असे म्हंटले.

कार्यक्रमादरम्यान, प्रा. डॉ सर्जेराव रणखांब यांनी हिंदी भाषेच्या विविध रूपांवर प्रकाश टाकून तिच्या भाषिक विविधतेवर प्रकाश टाकला - खारीबोली, अवधी, ब्रज, बुंदेली, भोजपुरी इत्यादी. हिंदी साहित्याच्या प्राचीन आणि आधुनिक परंपरांवर चर्चा करताना, त्यांनी कबीर, तुलसीदास, प्रेमचंद आणि महादेवी वर्मा यांसारख्या महान साहित्यिकांच्या योगदानाचे स्मरण केले. उपप्राचार्य डॉ. पटेल एम.एम. यांनी स्पष्ट केले की, पत्रकारिता, अनुवाद, अध्यापन, प्रशासन, माध्यमे, चित्रपट, पर्यटन आणि माहिती तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रात हिंदी भाषेतून रोजगाराच्या व्यापक संधी उपलब्ध होतात. विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचा अभ्यास करण्यास आणि वापरण्यास प्रोत्साहित करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी हिंदी कवितांचे वाचन केले. या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आणि उपस्थित लोकांमध्ये हिंदी भाषेबद्दल जागरूकता आणि आदराची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्यंकट खंदकूरे यांनी केले आणि प्रा. दुर्गा जाधव यांनी आभार मानले.

ऊस तोड कामगार कुटुंबाला कारखानदारांकडून २३ लाखांची मदत




धाराशिव (प्रतिनिधी) डोंगरवाडी येथील ऊस तोड कामगार गणेश डोंगरे यांच्या अपघाती मृत्यूनंतर प्रशासन आणि साखर कारखान्यांकडून सुरुवातीला दुर्लक्ष होत असताना, मानवी हक्क अभियानाने आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनामुळेच अखेर या प्रकरणाला गती मिळाली.

संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे संबंधित यश साखर कारखान्याकडून मृत कामगाराच्या कुटुबाला २३ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली असून हा संपूर्ण न्यायसंघर्षाचा विजय मानवी हक्क अभियानाला यश आले असून कामाच्या ठिकाणी झालेल्या अपघातात गणेश डोंगरे यांचा मृत्यू झाल्यानंतर पत्नी व तीन लहान मुलांचे भवितव्य अंधारात गेले होते. शासन, प्रशासन आणि साखर कारखाने गप्प असताना मानवी हक्क अभियानाने पुढाकार घेत जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले. मृत कामगाराच्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी शासन व कारखान्यांनी घ्यावी, त्या कुटुंबास किमान ५० लाख रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. या निवेदनानंतरच व संघटनेच्या दबावामुळे १९ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला, तर ऊस तोड कामगार महेश याने घेतलेली ४ लाख रुपयांची उचल पूर्णतः माफ करण्यात आली. त्यामुळे एकूण २३ लाख रुपयांची मदत कुटुंबाला मिळाली आहे.

मानवी हक्क अभियानाने ही मदत प्राथमिक असल्याचे सांगत मृत कामगाराच्या कुटुंबाला पूर्ण न्याय मिळेपर्यंत सघर्ष सुरूच राहील, अशी भूमिका घेतली आहे. संघटना नसती तर हे प्रकरण दडपले गेले असते. या निवेद्रावर मानवी हक्क अभियानचे जिल्हाध्यक्ष कैलास पवार, जिल्हा सचिव माहन ताटे, समन्वयक अरुणकुमार माने, सय्यद रझाक, सुग्रीव काबळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

व्ही पी शैक्षणिक संकुलात राजमाता जिजाऊ व स्वामी जयंती साजरी



धाराशिव (प्रतिनिधी)- तालुक्यातील आळणी शिवारातील गडपाटी येथील व्ही पी शैक्षणिक संकुलात डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्रारंभिक राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजमाता जिजाऊ यांच्या कर्तृत्वावर तसेच स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित व्याख्यान तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी व्ही पी शैक्षणिक संकुलाचे प्रशासकीय अधिकारी व एसबीएनएम फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, आर.पी. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गाझी शेख, एस. पी. पॉलीटेक्निकचे प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, वेलनेस फिजिओथेरपी कॉलेजच्या प्राचार्य डॉ. पूजा आचार्य, बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य ऋषिकेश लोमटे, डेअरी महाविद्यालयाचे प्राचार्य बालाजी वाघमारे, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, आयटीआयचे व्यवस्थापक प्रा. दत्तात्रय घावटे, लेखापाल योगेश मंडलिक तसेच संकुलातील सर्व महाविद्यालयांचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अखेर पत्रकार सुनील ढेपे यांचा जामीन मंजूर

धाराशिव (प्रतिनिधी) तुळजापूर पोलीस ठाण्यांतर्गत खंडणी प्रकरणातील पत्रकार सुनील ढेपे यांच्या विरुद्ध नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यातील प्रकरणात ढेपे यांना तुळजापूर न्यायालयाकडून दि.१२ जानेवारी रोजी जामीन मंजूर करण्यात आला आहे.

तुळजापूर येथील न्यायालयात ढेपे यांच्यावतीने जामीन अर्जावर ड. विशाल साखरे यांनी केलेला प्रखर युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायाधीशांनी त्यांचा जामीन मंजूर केला. या प्रकरणात न्यायालयीन रिमांड स्टेजला संघर्षपूर्ण युक्तिवाद प्रथम हजर केलेल्या रिमांड वेळेस पोलिसांनी १० दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. परंतू ड साखरे यांच्या युक्तिवादामुळे पोलिसांना न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी दिली. तर हजर केल्यानंतर रिमांड वेळेस पुन्हा पोलिसांनी १० दिवसांची कोठडी मागितली. त्यावेळी देखील ड. साखरे यांनी प्रखर बाजू मांडून वास्तविक पोलीस अधिकारी हे अवास्तव पोलीस



कोठडी मागत आहेत. पोलीस कोठडीसाठी नमूद करणे संयुक्तिक नसल्याचा युक्तिवाद सादर केला सदर युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने पोलीस प्रशासनास अवास्तव आणि योग्य कारण मिमांसा स्पष्ट करणे कोठडीसाठी गरजेचे असल्याचे सरकारी वकील व पोलिसांना चांगलेच सुनावले. तर १० दिवसांची पोलीस कोठडी कशासाठी ? असा प्रश्न विचारीत सरकारी वकील व पोलिसांना धारेवर धरले होते. त्यामुळे फक्त एक दिवसाची पोलिस कोठडी दिली. यावेळी ॲड साखरे यांनी खंडणी मागणीत कोणतेही तथ्य नाही. एका तिन्हाईत व्यक्तीने तिसऱ्याच व्यक्तीच्या खात्यावर फिर्यादीच्या सांगण्यावरून खंडणीचे ५ हजार रुपये रक्कम दिल्याचा आरोप खोटा असल्याचा युक्तिवाद केला. तसेच सर्वोच न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे दाखले देत ड. साखरे यांनी ढेपे यांचे कोणतेही आर्थिक व्यवहार झालेले नाहीत. तसेच राजकीय हेतूने व क्रूस प्रकरणाच्या बातम्या केल्यामू त्यांच्यावर द्वेश भावनेने वरील गुन्हा नोंदवला असल्याचा युक्तिवाद देखील ॲड साखरे यांनी केले. साखरे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने ढेपे यांची जामीनावर मुक्तता केली. या प्रकरणात ॲड. विशाल साखरे यांना ॲड, मंजुषा साखरे, ॲड. विराज जगदाळे (विशेष सहकार्य), ॲड. महेश लोहार, ॲड. शुभम तांबे, ॲड, अर्चना कांबळे, ॲड, संकेत गोरे, ॲड ओंकार कोरेगावकर, ॲड, अमित गोळे, ॲड, लक्ष्मीकांत कुलकर्णी, रोहित लोमटे, महेश पवार यांनी सहकार्य केले.

आळणी जि प शाळेत जिजाऊ व स्वामी यांची जयंती साजरी

आळणी (प्रतिनिधी) तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमात इयत्ता १ ली ते ७ वी मधील विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांतून संस्कारक्षम शिवरायांना जिजाऊंच्या मातृत्वाचे, घडविण्यातील त्यांच्या भूमिकेचे तसेच समाजासाठी दिलेल्या प्रेरणादायी योगदानाचे महत्त्व विशद केले. यावेळी यांच्या विचारांचा आदर्श आपल्या जीवनात अंगीकारावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली ती विद्यार्थ्यांनी साकारलेली राजमाता जिजाऊंची वेशभूषा. या वेशभूषेमुळे संपूर्ण कार्यक्रमात ऐतिहासिक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. तसेच मुख्याध्यापक बशीर तांबोळी यांनी मनोगत व्यक्त करताना, जिजाऊंसारखी संस्कार देणारी, मूल्यांची शिकवण देणारी आई आजच्या समाजाला अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त आळणी येथील छावा प्रतिष्ठानच्यावतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना केळीचे वाटप करण्यात आले. यावेळी छावा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वीर, अजय देशमुख, अजित वीर, शुभम गाडे, संकेत वीर, विष्णू लावंड, अजय निंबाळकर, बालाजी वीर, अविनाश कदम, निलेश कदम, निखिल वीर, निलेश वीर, निलेश नांदे, निलेश वीर, प्रतीक कदम, स्वप्नील वीर, रोहित तौर आदींसह संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत माने यांनी तर आभार दिनेश पेठे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक जया नवले, सुमन इंगळे, सखुबाई कदम, स्वाती मुपडे, महादेवी सावळकर, नेहा भंडारे राजेंद्र दीक्षित, अश्विनी भांगे यांनी परिश्रम घेतले.

बालगृहात जिजाऊ व स्वामी यांची जयंती साजरी



धाराशिव (प्रतिनिधी) महिला व बालविकास विभाग अंतर्गत कार्यरत धर्मवीर संभाजीराजे सामाजिक बहुउद्देशीय संस्था, तुळजापूर संचलित निरीक्षणगृह, बालगृह येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती दि. १२ जानेवारी रोजी साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून करण्यात आली. यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या कर्तृत्वावर तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरणादायी विचारांवर प्रकाश टाकला. यानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रभारी अधीक्षक माधुरी हरवले, आर के शहापुरे, बी आर कदम, आशा भिसे, ओमप्रकाश निपाणीकर, प्रशांत मते व बालगृह, निरीक्षण गृहातील विद्यार्थी उपस्थित होते.

नवोदय विद्यालयात जिजाऊ व स्वामी यांची जयंती साजरी

धाराशिव (प्रतिनिधी) तुळजापूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती दि. १२ जानेवारी रोजी साजरी करण्यात आली. प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य डी व्ही बडे यांच्या हस्ते स्वामी व जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी हरी जाधव, डॉ. सुरेश चिमटे, पी एन जोशी, बसवराज बोरकर यांची उपस्थिती होती. तसेच विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक वृंद उपस्थित होता. यावेळी श्रेया बारकुल, संजना चौगुले, सत्यम यादव या विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या चरित्रावरती आपले विचार व्यक्त केले. डॉ. सुरेश चिमटे यांनीही स्वामी विवेकानंद व वीरमाता जिजाऊ यांचे कार्य कसे महान होते हे वेगळ्या प्रसंगाद्वारे सांगून विद्यार्थ्यांना अचिंबित केले. तर प्रभारी प्राचार्य श्री

डी व्ही बडे यांनी राजमाता जिजाऊंच्या जीवनातून आपण संस्कार, कर्तव्यनिष्ठ, देशप्रेम, आत्मविश्वास हे गुण प्रामुख्याने आत्मसात केले पाहिजे. कारण त्या केवळ ममतेच्या मूर्ती नव्हत्या. तर एक परिपूर्ण वीरमाता, आदर्श माता होत्या. स्वामी विवेकानंद हे केवळ संन्याशी नव्हते तर युवकांचे आदर्श स्थान होते.

अशा महान व्यक्तींच्या कार्याचा गौरव करून त्यांचे आदर्श गुण आपण अंगीकारले पाहिजेत आवाहन त्यांनी केले. तर विद्यालय परिसरात स्वदेशी संकल्प दौड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हरी जाधव, यश पाटील, बसवराज बोरकर, सनी जाधव, प्रियंका लोमटे, निषाद भुते यांनी विशेष पुढाकार घेतला होता. तसेच दिल्लीतून होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे थेट प्रक्षेपण सर्व विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी जाधव यांनी केले.

राजमाता जिजाऊ यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

धाराशिव (प्रतिनिधी) शहरामध्ये राजमाता जिजाऊ यांची जयंती विविध सामाजिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात दि.१२ जानेवारी रोजी साजरा करण्यात आली. सकाळपासूनच जिजाऊ चौकात जिजाऊ प्रेमींनी जिजाऊंना अभिवादन करण्यासाठी गर्दी केली होती. जिजाऊ उत्सव पारंपारिक पद्धतीने मात्र मोठ्या जल्लोषात साजरा केल्याने संपूर्ण परिसर जिजाऊंच्या जयघोष यांनी दणाणून गेला होता.

धाराशिव येथील जिजाऊ चौकामध्ये मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समिती अध्यक्ष प्रणिता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख मान्यवरांच्या हस्ते जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार राणाजगजीतसिंह पाटील, नगराध्यक्ष नेहा काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. तर वृक्षारोपण करण्यात



आले. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक आणि विविध संस्थांनी भाग घेऊन जिजाऊंच्या विचारांना अभिवादन केले.

या उत्सवांमध्ये जिजाऊंच्या कार्याचा गौरव करण्यात आला आणि त्यांच्या विचारांवर आधारित सामाजिक उपक्रम राबवले गेले. यामध्ये रक्तदान आणि वृक्षारोपण याचा समावेश आहे. जिजाऊ चौकात जिजाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. तर मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समितीच्यावतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

विशेष म्हणजे आज जन्मलेल्या मुलींना कपडे व मातांना साडी चोळी आदींचे वाटप करण्यात आले. तसेच नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेविका यांचा सत्कार करण्यात आला. तर विद्यार्थ्यांनी वेशभूषा काढून शोभायात्रा व वाहन रॅली काढण्यात आली. या कार्यक्रमास जिजाऊ प्रेमी, शिवप्रेमी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आई म्हणून नवोदय विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांची सुरक्षा ही माझी जबाबदारी : जिल्हाधिकारी वर्षा घुगे ठाकूर

सर्व पालकांनी आमच्यावर विश्वास ठेवून मुलांना विद्यालयात पाठवावे

दै. अदिती एक्सप्रेस

शिरूर अनंतपाळ /प्रतिनिधी- नवोदय विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पालकांच्या संवाद सभेत जवाहर नवोदय विद्यालय लातूर येथील सर्व विद्यार्थ्यांची आई म्हणून मी संपूर्ण जबाबदारी स्वीकारत असल्याचे सांगून उपस्थित पालकांनी आमच्यावर विश्वास ठेवून आपल्या मुलांना विद्यालयात पाठवण्याचे आवाहनही यावेळी त्यांच्या वतीने करण्यात आले.

ता.४ जानेवारी रोजी जवाहर नवोदय विद्यालय लातूर येथे इयत्ता सहावी मध्ये शिकत असलेल्या अनुष्का पाटोळे या विद्यार्थिनीचा मृतदेह आढळल्यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ माजली होती. विद्यालयात घडलेल्या या गंभीर प्रकारामुळे विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसहित



जवाहर नवोदय विद्यालय लातूर येथे पालकांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे व अधिकारी.

पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना ताबडतोब आपल्या घरी घेऊन आले होते.या सर्व घटनेची चौकशी चालू असतानाच लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी पालकांसोबत संवाद साधता यावा व या घटनेमुळे पालकांत निर्माण झालेली भीती पालकांसोबत चर्चेच्या माध्यमातून दूर करून विद्यार्थ्यांना परत शाळेमध्ये पाठवण्यासाठी संवाद सभेचे ता.१२ जानेवारी रोजी त्यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.

प्रथमता उपस्थित पालकांनी घडलेल्या घटनेचा तीव्र शब्दात निषेध करून विद्यालयात असलेल्या अनेक समस्यांचा पाडाच जिल्हाधिकारी यांच्यासमोर वाचला.यावर त्यांनी पालकांशी संवाद साधताना तुम्ही तुमच्या मुलांची काळजी करणे योग्य आहे परंतु विद्यालयात घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असून यापुढे विद्यालयात असा प्रकार घडणार नाही व विद्यार्थ्यांची आई म्हणून मी संपूर्ण जबाबदारी स्वीकारते असे सांगून आपण आपल्या मनामध्ये कुठलीही भीती न बाळगता आम्हाला व विद्यालयाला सहकार्य करून आपली मुले विद्यालयात पाठवावे असे सांगून पालकांनी विद्यालया विषयी सांगितलेल्या समस्या सोडवण्यासाठी तात्काळ सूचनाही दिल्या. यावेळी लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे,डिशनल कलेक्टर करमरकर मॅडम,डेप्युटी कलेक्टर संगीता टकले,एसडीएम रोहिणी नरे, डीओ भापकर मॅडम,डीवायएसपी लातूर साळवे,एमआयडीसी पोलीस स्टेशन लातूरचे पीआय समाधान चौरे,पीडब्ल्यूडी चे क्षिरसागर,समाज कल्याण अधिकारी,लातूर तहसीलदार यांच्यासह विद्यालयाशी संबंधित सर्व अधिकारी तसेच विद्यालयाचे प्राचार्य गणपती मस्के उपस्थित होते.



लातूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी

यशस्वीरित्या पूर्ण केले फार्मर्स कप चे प्रशिक्षण

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर / प्रतिनिधी- कृषी विभाग, उमेद व पाणी फाउंडेशन यांच्या मार्फत ज्ञानप्रबोधीनी प्रशिक्षण केंद्र हराळी, तालुका लोहारा, जिल्हा धाराशिव येथे दिनांक ०८.०१.२०२६ ते १०.०१.२०२६ या कालावधीत फार्मर्स कप बाबत तीन दिवसीय निवासी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले होते. या प्रशिक्षण केंद्रावर लातूर तालुक्यातील ५१ प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांची पहिली बॅच यशस्वीरित्या आनंदाच्या वातावरणामध्ये पार पडली.

यामध्ये सर्व शेतकरी बांधवांनी उत्साहाने सक्रियपणे सहभाग नोंदवला. प्रत्येक सत्रामध्ये सहकार्य केले. सर्व शेतकऱ्यांना गट शेती, विषमुक्त शेती, उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान, फार्मर्स कप मध्ये सहभागी होण्यासाठी अनुसरावयची कार्यपद्धती, गुणांकन या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. फार्मर कप २०२६ मध्ये आम्ही सहभागी होऊन उत्पादन खर्च कमी करू आणि उत्पादन वाढवू त्याचबरोबर राज्यस्तरावरचे बक्षीस आम्ही घेऊ अशा भावना लातूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या. या प्रशिक्षणास मा महेशकुमार तिर्थकर सर, विभागीय कृषी सहसंचालक लातूर, मा भास्कर कोळेकर सर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी लातूर यांनी उपस्थित राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणावेळी मराठवाडा विभागीय समन्वयक संतोष शिंगारे सरांनी भेट देऊन उपस्थित सर्व शेतकऱ्यांसोबत संवाद साधला.

या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी सर्व शेतकरी बांधवांनी निमंत्रक म्हणून नोंदणी केली. या प्रशिक्षणामध्ये पाणी फाउंडेशन च्या तज्ञ व्यक्तींनी वेगवेगळी सत्र आणि सांघिक खेळाद्वारे शेतकऱ्यांना फार्मर्स कप मध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. लातूर तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांना या फार्मर्स कप मध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या समन्वयाने दुसऱ्या प्रशिक्षणासाठी नोंदणी करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी लातूर श्री प्रमोद राठोड यांच्या वतीने करण्यात येत आहे.

'यशवंत' मध्ये श्री.सुरेश धूत संचालित ध्यानधारणा उपक्रमाचे आयोजन

दै. अदिती एक्सप्रेस

नांदेड:- श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयातील अध्यात्मिक शिक्षण समितीतर्फे माजी प्र-कुलगुरु प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार ध्यान शिबिर संचालक श्री.सुरेश धूत संचालित विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी विविध ध्यानधारणा प्रयोगांचे प्रात्यक्षिक दि. १४ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता आयोजन करण्यात आले आहे.





या उपक्रमाचे अध्यक्षस्थान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे भूषविणार आहेत. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे, डॉ.हरिश्चंद्र पतंगे आणि प्रबंधक संदीप पाटील यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

तरी या ध्यानधारणा उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन समिती समन्वयक व राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अजय गव्हाणे, सदस्य डॉ. वीरभद्र स्वामी, डॉ.दिगंबर भोसले, डॉ. रत्नमाला म्हस्के, डॉ.राजकुमार सोनवणे, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील यांनी केले आहे.

मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये राजमाता जिजाऊव स्वामी विवेकानंद जयंती साजरी

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर / प्रतिनिधी- परिसरातील मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्येराजमाता जिजाऊव स्वामी विवेकानंद यांची जयंती विद्यार्थ्यांनी उत्साहात साजरी केली.

सर्व प्रथम राजमाता जिजाऊव स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजनप्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते करण्यात आले.

शाळेच्या शिक्षिकामाधुरी वाघमारे यांनी राजमाता जिजाऊ यांच्याबद्दल माहितीदिली. सिंदखेडचे लखुजी जाधव हे जिजाऊचे वडील व आईचे नाव म्हाळसाबाईहोते. राजमाता जिजाऊयांचा जन्म महाराष्ट्रातील सध्याच्या बुलढाणाजिल्ह्यातील सिंदखेड जवळील देऊळगाव येथील म्हाळसाबाई जाधव आणि लखुजी जाधवयांच्या



पोटी झाला. जिजाऊचा विवाह लहान वयातशहाजी भोसलेयांच्याशी दौलताबाद येथे झाला.राजमाता जिजाऊ यांची शाळेच्या विद्यार्थिनीगौरवी प्रवीण यादव, मेधाविनी मिलिंद दवणे, श्राव्या संतोष जाधव, अनन्या महेश नाईक, ओवी चंद्रकांत माळीयांनी वेशभूषा साकारून आपले मनोगत व्यक्त केले.

शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी स्वामी विवेकानंद यांची माहिती दिली. त्यांच्या कार्याची माहिती देतानातेम्हणालेस्वामी विवेकानंद यांचे पूर्ण नाव नरेंद्र विश्वनाथ दत्त असे होते. स्वामी विवेकानंद हे मूळचे पश्चिम बंगालचे रहिवासी होते. स्वामी विवेकानंद हे बुद्धिमान तर होतेच परंतु प्रत्येक गोष्ट अनुभवाच्यापातळीवर कसून बघण्याची त्यांना सवय होती.या निमित्ताने शाळेचे विद्यार्थी वरद विकास झांबरे, प्रणव नानासाहेब कदम याने स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा साकारून आपले मनोगत व्यक्त केले.

शाळेतीलसर्व विद्यार्थी व शिक्षिकांनीराजमाता जिजाऊव स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेच्या शिक्षिका प्रणिता कांबळे यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठीशाळेच्या शिक्षिकाव शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

सुजाण विवेकी मतदार लोकशाहीचा आधार - डॉ.बाबासाहेब ठोंबरे

कृषि महाविद्यालयात मतदार जनजागृती कार्यक्रम संपन्न

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय लातूर येथे जिमखाना व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यामाने मतदार जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय समालोचनात कृषि महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की लोकशाही मजबूत होण्यासाठी सर्वांनी मतदानात सक्रिय भाग घेणे गरजेचे आहे. त्यासाठी युवकांनी मतदानाचे महत्व सर्वांना पटवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा. नागरीक जेंव्हा विवेकबुध्दीने आपले मत नोंदवतील त्यावेळी लोकशाही सुदृढ होण्यास मदत होईल. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक



महाराष्ट्र शासनाचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कारप्राप्त सुधाकर देशमुख म्हणाले की युवकांनी स्वत: जबाबदारी स्विकारुन मतदानाचा टक्का वृध्दी करण्यासाठी जनमानसामध्ये मिसळून प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत. लोकशाही प्रगल्भतेसाठी सर्वांनी मतदानाचे महत्व ओळखून जागरुकतेने मतदान करावे. कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. (डॉ.) इंद्रमणि यांच्या प्रेरणेने व संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ.भगवान आसेवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.व्यंकट जगताप, डॉ.राजेश शेळके, डॉ.पद्माकर वाडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिजाऊ माँ साहेब तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमीत्त प्रतिमा पूजन करण्यात आले तसेच त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. व्यंकट जगताप, सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.अनिलकुमार कांबळे तर आभार डॉ.दयानंद मोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ.अनंत शिंदे, डॉ.सुनिता मगर, डॉ. प्रभाकर अडसूळ, डॉ.ज्ञानेश्वर सुरडकर, डॉ.अजित पुरी, श्री.भगवान कांबळे, डॉ.ममता पतंगे, श्रीमती माया भिकाणे, सुधीर सदर, प्रकाश कांबळे, श्रीमती सुरेखा सोरेकर, श्रीमती मीना साठे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास पदवी व पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, महाविद्यालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शंभूलिंग मध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर प्रतिनिधी- महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर यांच्या वतीने संचलित श्री शंभुलिंग शिवाचार्य माध्यमिक विद्यालय, गिरवलकर नगर, लातूर येथे दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी राजमाता जिजाऊ यांचा जन्मोत्सव व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पुष्पा गोविंदराव पाटील यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून पुष्पहार अर्पण केला. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापिका पाटील यांनी राजमाता जिजाऊ संस्कारक्षम नेतृत्वाचा व स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरणादायी विचारांचा विद्यार्थ्यांच्या जीवनात मोठा प्रभाव असल्याचे सांगितले. त्यांच्या जीवनातील आदर्श, राष्ट्रभक्ती, आत्मविश्वास व चारित्र्यनिर्मितीचे विचार आत्मसात करून विद्यार्थ्यांनी उज्ज्वल भवितव्य घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

'केशवराज' मध्ये राष्ट्रमाता जिजाऊ,स्वामी विवेकानंद यांची जयंती संपन्न व स्नेहसंमेलनाची क्रीडा स्पर्धेने उत्साहात सुरुवात

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.१२ जानेवारी २०२६ सोमवार रोजी पाचवी ते सातवी विभागात राष्ट्रमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. तसेच विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलनाची क्रीडा स्पर्धेने सुरुवात करण्यात आली.

यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा माध्यमिक शालेय समिती सदस्य नरेंद्र पाठक,केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, कार्यक्रमासाठी लाभलेल्या प्रमुख पाहुण्या स्वप्नाली पाटील,पर्यवेक्षक अंजली निर्मळे,राम जोशी, वार्षिक स्नेहसंमेलन प्रमुख शैलजा देशमुख,सहप्रमुख बालासाहेब करपुडे, जिजाऊंच्या वेशभूषेतील विद्यार्थिनी अनुष्का गुरव यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम युगपुरुष स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ



यांच्या प्रतिमेचे पूजन करून नारळ वाढवून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी अनुष्का गुरव या विद्यार्थिनींने जिजाऊंचे स्वगत व्यक्त केले. त्यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या स्वप्नाली पाटील यांनी आईच्या संस्कारातून राष्ट्र घडते आणि तरुणांच्या विचारातून भविष्य घडते याविषयी विद्यार्थ्यांना गोष्ट सांगून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा माध्यमिक शालेय समिती सदस्य नरेंद्र पाठक यांनी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनाची उद्घोषणा करून विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनातील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक,परिचय व स्वागत श्वेता अयाचित यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार मंजुषा बरसाले यांनी मांडले. कांचन तोडकर यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी इयत्ता पाचवीच्या मुलांची कबड्डी व मुलींची लंगडी या क्रीडा स्पर्धेने स्नेहसंमेलनाची उत्साहात सुरुवात झाली. बलोपासक मंडळ प्रमुख तथा क्रीडा शिक्षक गुरूनाथ झुंजारे, मंजुषा बरसाले यांची उपस्थिती होती. इयत्ता पाचवी लंगडी स्पर्धा प्रमुख सुवर्णा चव्हाण, सहाय्यक मीरा चामवाड, सोनाली निर्मळ, प्रतीक्षा कुलकर्णी,अपर्णा स्वामी,श्वेता अयाचित यांनी मुलींच्या स्पर्धा घेण्यासाठी सहकार्य केले तसेच प्रसाद गिरवलकर, निलेश तावशीकर, अमोल नराळे, गिरीश डाके, नित्यानंद बिराजदार यांनी मुलांच्या कबड्डी स्पर्धेसाठी परिश्रम घेतले.इयत्ता पाचवी एकूण १० तुकडीतील मुलांनी स्पर्धेचा आनंद घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख मीरा चामवाड, कार्यक्रम प्रमुख तेजस्विनी मुंडे,सर्व मंडळ प्रमुख यांनी सहकार्य केले.

केंद्र संचालक व पर्यवेक्षक अदलाबदलीच्या निर्णयास जुक्टाचा तीव्र विरोध

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर । प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी व १२ वी बोर्ड परीक्षा केंद्रस्तरावर सध्या सुरळीतपणे सुरू असताना, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक करणे तसेच परीक्षा काळात केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांची अदलाबदल करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय परीक्षा संचलनात अडथळा निर्माण करणारा असल्याचा आरोप करत लातूर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन (जुक्टा) संघटनेने या निर्णयास तीव्र विरोध दर्शविला आहे.

या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा जुक्टा संघटनेच्या वतीने लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांच्याशी सविस्तर चर्चा करून त्यांना निवेदन देण्यात आले.

दरम्यान, मंडळाच्या या निर्णयाबाबत सखोल चर्चा करण्यासाठी राज्य मंडळाध्यक्षांसोबत महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक दिनांक, १३ जानेवारी २०२६ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात



आली आहे. या बैठकीस महासंघाचे राज्य उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हा जुक्टा संघटनेचे अध्यक्ष प्रा. शिवराम सूर्यवंशी उपस्थित राहणार असून, बैठकीतील निर्णयानुसार पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जाणार आहे.

परीक्षा मंडळाच्या निर्णयाला विरोध दर्शवण्यासाठी लातूर जिल्हा जुक्टा संघटनेच्या वतीने विभागीय अध्यक्षांना निवेदन देताना जिल्हाध्यक्ष प्रा. शिवराम सूर्यवंशी, विभागीय अध्यक्ष तथा जिल्हा जुक्टा सचिव प्रा. बाळासाहेब बचाटे, सहसचिव प्रा. रमेश केंद्रे, कार्यालयीन सचिव प्रा. राजेंद्र नागरगोजे, लातूर तालुकाध्यक्ष प्रा. विनोद पुरी, प्रा. लहुकांत शेवाळे, प्रा. नितीन सेलुकर, प्रा. अंकुश सूर्यवंशी, प्रा. आर. एस. नाबदे, प्रा. गजानन तनशेटे, प्रा. डी. एल. तेलंग, प्रा. गोविंद सूर्यवंशी, प्रा. के. डी. चव्हाण यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.